क्रमांक:१४६५५/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक: २२ ऑक्टोबर, २०२०.

**संदर्भ:- या सचिवालयाचे ज्ञापन क्र.१४६५४/क-१, दिनांक २२ ऑक्टोबर, २०२०**

**:: परिपत्रक ::**

या सचिवालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भाधीन ज्ञापनान्वये विधान भवन, नागपूर येथे नवीन विधानपरिषद सभागृहाचे बांधकाम, मध्यवर्ती सभागृहाचे बांधकाम व इतर तद्नुषंगिक कामे करण्यात येणार असून उक्त कामांचे सनियंत्रण, देखभाल व त्यासंदर्भातील प्रशासकीय कार्यवाही करण्याकरिता विधान भवन, नागपूर येथे या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश असलेला स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आला आहे.

अत: विधान भवन, नागपूर येथे निर्माण करण्यात आलेल्या कक्षात अंतर्भूत असलेल्या पदांमध्ये उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी, लिपिक-टंकलेखक, शिपाई या पदांचा समावेश आहे. सदर पदांसाठी विधान भवन, नागपूर येथे बदलीने जाण्यासाठी इच्छूक असलेल्या या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी आपली नावे दिनांक २९ ऑक्टोबर, २०२० रोजीपर्यंत "क-१" आस्थापना कक्षास कळवावीत.

**(पूनम ढगे)**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
२) मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३) मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी.

६) संगणक (क-२) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (संकेतस्थळावर अपलोड करण्याकरिता).

७) निवडसूची.